पुण्यनगरी

शिवाजी विद्यापीठात आप्पासाहेब पवार यांना विद्यापीठात अभिवादन

कोल्हापूर : प्रतिनिधी

शिवाजी विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या ४० व्या स्मृतिदिनानिमित्त गुरुवारी विद्यापीठात त्यांच्या पवित्र स्मृतींना अभिवादन करण्यात आले.

विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीत सकाळी कुलगुरू डी. टी. शिर्के व प्र-कुलगुरू पी. एस. पाटील यांच्या हस्ते डॉ. पवार यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. त्यानंतर विद्यापीठ प्रांगणातील अतिथीगृहासमोरील डॉ. पवार यांचा अर्धपुतळा आणि डॉ. आप्पासाहेब पवार कमवा आणि शिका विद्यार्थी वसतिगृह येथील अर्धपुतळा यांनाही पुष्पहार अर्पण करण्यात आले.

याप्रसंगी डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या कार्याचा आढावा घेण्यात आला. कुलसचिव व्ही. एन. शिंदे, प्रा. किसनराव कुराडे, टी. के. सरगर, प्राचार्य जी. पी. माळी, एस. जे. नाईक, मानसिंगराव जगताप, सी. टी. पवार, सी. एच. भोसले, एन. एल. तरवाळ आदी उपस्थित होते.

31 DEC 2021
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

विवेकानंद कॉलेजला सर्वसाधारण विजेतेपद

शिवाजी विद्यापीठाचा ४१ वा मध्यवर्ती युवा महोत्सव : ३२ कला प्रकारात १ हजार ३०० विद्यार्थ्यांचा सहभाग

महागाव : येथे झालेल्या शिवाजी विद्यापीठ मध्यवर्ती युवा महोत्सवात सर्वसाधारण विजेतेपदाचा चषक कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते स्वीकारताना विवेकानंद कॉलेजचे विद्यार्थी, शेजारी उपस्थित मान्यवर.

वार्ताहर
महागाव

शिवाजी विद्यापीठाचा विद्यार्थी विकास विभाग आणि संत गजानन महाराज इंजिनिअरिंग कॉलेज महागाव यांच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या ४१ व्या मध्यवर्ती युवा महोत्सवात विवेकानंद कॉलेजने सर्वसाधारण विजेतेपद पटकावले. डॉ. आप्पासाहेब पवार वैयक्तिक स्पर्धा जनरल चॅम्पियनशिप व अजितदादा कदम साधिक स्पर्धा जनरल चॅम्पियनशिप विवेकानंद कॉलेजच्या संघाला कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते चॅम्पियनशिप ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले. यावेळी प्र-कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील, प्राचार्य डॉ. एस. एच. सावंत, डॉ. आर. व्ही. गुरव, ॲड. बाळासाहेब चव्हाण, डॉ. यशवंत चव्हाण, अभिनेते राहुल मगदूम, डॉ. पी. एस. पाटील, गोकुळचे संचालक अजित नरके, डॉ. डी. जी. चिपळीकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

मध्यवर्ती युवा महोत्सवाचा निकाल पुढीलप्रमाणे

साधिक चॅम्पियनशिप स्पर्धेत सरदार बाळासाहेब माने लोककला फिरता चषक सद्गुरु गाडगे महाराज कॉलेज, कराड व सरदार बाळासाहेब माने लोकनृत्य फिरता चषक डॉ. पतंगराव कदम कॉलेज, सांगली यांनी पटकावला. विलिंग्डन महाविद्यालय शताब्दीनिमित्त फिरते गौरव चषक नृत्य विभागात लोकनृत्य, लोककला, शास्त्रीय नृत्य विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर यांनी पटकावला. नाट्य विभागातील एकांकिका, लघुनाटीका, मुकनाट्य, नकला, एकपात्री अभिनयात दताजीराव कदम आर्टस, सायन्स ॲन्ड कॉमर्स कॉलेज इचलकरंजी, संगीत विभागात लोकसंगीत, वाद्यवृंद, पाश्चिमात्य समूहगीत, सुगम गायन, भारतीय समूहगीत, पाश्चिमात्य एकल गायन, वादन, शास्त्रीय सुरवाद्य, तालवाद्य, गायन यात विवेकानंद कॉलेज कोल्हापूर यांनी चषक पटकावला.

साधिक रचनाकृती- दताजीराव कदम कॉलेज इचलकरंजी, मुधोजी कॉलेज फलटण यांना अनुक्रमे प्रथम दोन क्रमांक मिळाले. श्री शिवशाहू महाविद्यालय सरुड व डेक्कन इंटेरिअर डिझाईन कॉलेज कोल्हापूर यांना तृतीय क्रमांक विभागून तर दि न्यू कॉलेज कोल्हापूर व विवेकानंद कॉलेज कोल्हापूर यांना विभागून उत्तेजनार्थ क्रमांक देण्यात आला.

कलाविभागात स्थळ चित्रण, व्यंगचित्रण, कातरकाम, भित्तीचित्र निर्मिती, स्पॉट फोटोग्राफी, मातीकाम, रांगोळी, सांघीक रचनाकृती, मेंहदी रचना या कलेत दताजीराव कदम आर्टस, सायन्स ॲन्ड कॉमर्स कॉलेज इचलकरंजी यांनी चषक पटकावला. वाङ्मय विभागात विभागून मराठी, हिंदी, इंग्रजी वक्तृत्व, वाद-विवाद, प्रश्नमंजुषा या विभागात दि न्यू कॉलेज कोल्हापूर व डी. पी. भोसले कॉलेज कोरेगाव यांना चषक देण्यात आले.

लोककला-सद्गुरु गाडगे महाराज कॉलेज कराड, दि न्यू कॉलेज कोल्हापूर यांना अनुक्रमे प्रथम व द्वितीय क्रमांक मिळाला. तर दहिवडी कॉलेज व श्रीमती आक्काताई रामगोंडा पाटील कन्या महाविद्यालय इचलकरंजी यांना तृतीय क्रमांक विभागून तर किसनवीर महाविद्यालय वाई व आर्टस, सायन्स, कॉमर्स कॉलेज कोवाड यांना उत्तेजनार्थ क्रमांक विभागून देण्यात आले.

एकांकिका - छत्रपती शिवाजी कॉलेज सातारा, दताजीराव आर्टस, सायन्स, कॉमर्स कॉलेज इचलकरंजी, विवेकानंद कॉलेज कोल्हापूर यांना अनुक्रमे प्रथम तीन क्रमांक मिळाले.

सर्वोत्कृष्ट पुरुष अभिनय एकांकिका - छत्रपती शिवाजी कॉलेज सातारा व सर्वोत्कृष्ट स्त्री अभिनय एकांकिका- दताजीराव कदम कॉलेज इचलकरंजी यांना मिळाला.

साधिक स्पर्धा लोकनृत्य - डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय सांगली, विवेकानंद कॉलेज कोल्हापूर यांना अनुक्रमे प्रथम व द्वितीय क्रमांक तर आजरा महाविद्यालय, यशवंतराव चव्हाण कॉलेज उरण, इस्लामपूर यांनी तृतीय क्रमांक तर छत्रपती शिवाजी कॉलेज सातारा व डी. जी. कॉलेज सातारा यांना उत्तेजनार्थ क्रमांक विभागून देण्यात आला.

लघुनाटिका - श्री शिवशाहू महाविद्यालय कॉलेज सरुड, शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुंखे कॉलेज मिरज, यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट कॉलेज सातारा, विवेकानंद कॉलेज कोल्हापूर यांना अनुक्रमे प्रथम चार क्रमांक मिळाले.

मुखनाट्य - दताजीराव कदम कॉलेज इचलकरंजी, रत्नाप्पा कुंभार कॉलेज कोल्हापूर, दहिवडी कॉलेज, बळवंत कॉलेज विटा यांना अनुक्रमे प्रथम चार क्रमांक मिळाले.

पथनाट्य-दि न्यू कॉलेज कोल्हापूर, विवेकानंद कॉलेज कोल्हापूर यांनी अनुक्रमे प्रथम दोन क्रमांक पटकावले. दताजीराव कॉलेज इचलकरंजी, छत्रपती शिवाजी कॉलेज सातारा यांना तृतीय क्रमांक विभागून देण्यात आले. तर यशवंतराव चव्हाण कॉलेज उरण इस्लामपूर यांनी उत्तेजनार्थ क्रमांक पटकावला.

वाद-विवाद-दि न्यू कॉलेज कोल्हापूर, डी. पी. भोसले कॉलेज कोल्हापूर, इस्माइला साहेब मुल्ला लॉ कॉलेज कोल्हापूर यांना अनुक्रमे प्रथम तीन क्रमांक देण्यात आला.

प्रश्नमंजुषा - यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट सातारा, सर्व अधिविभाग शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, डी. पी. भोसले कॉलेज कोरेगाव यांना अनुक्रमे प्रथम चार क्रमांक मिळाले.

स्थळ चित्रण-शिवराज कॉलेज गडहिंग्लज, दताजीराव कॉलेज इचलकरंजी, राजा शिवछत्रपती कॉलेज महागाव, आर्किटेक्चर कॉलेज कोल्हापूर यांना अनुक्रमे प्रथम चार क्रमांक मिळाले.

व्यंगचित्र-विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, शिवशाहू महाविद्यालय सरुड, मुधोजी कॉलेज फलटण यांना अनुक्रमे प्रथम तीन क्रमांक मिळाले. तर आर्किटेक्चर कॉलेज कोल्हापूर, रत्नाप्पा कुंभार कॉलेज यांना उत्तेजनार्थ क्रमांक विभागून देण्यात आले. **भित्तीचित्र**-कलाप्रबोधीनीज मालजी पेंढारकर कोल्हापूर, ओंकार कॉलेज गडहिंग्लज, मुधोजी कॉलेज फलटण, शिवशाहू महाविद्यालय सरुड यांना अनुक्रमे प्रथम चार क्रमांक मिळाले. **कातरकाम**-रत्नाप्पा कुंभार कॉलेज कोल्हापूर, शिवशाहू महाविद्यालय सरुड, विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, दताजीराव कदम कॉलेज इचलकरंजी यांना अनुक्रमे प्रथम चार क्रमांक मिळाले. **स्थळ छायाचित्र**-ओंकार कॉलेज गडहिंग्लज, यशवंतराव चव्हाण कॉलेज उरण इस्लामपूर, विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, शिवशाहू महाविद्यालय सरुड यांना अनुक्रमे प्रथम चार क्रमांक मिळाले. **मातीकाम**-दताजीराव कदम इचलकरंजी, वेणुताई चव्हाण कॉलेज कराड, मुधोजी कॉलेज फलटण, ओंकार कॉलेज गडहिंग्लज यांना अनुक्रमे प्रथम चार क्रमांक मिळाले.

रांगोळी-दताजीराव कदम इंचलकरंजी, शिवराज कॉलेज गडहिंग्लज, डॉ. पतंगराव कदम कॉलेज सांगली, लॉ कॉलेज सातारा यांना अनुक्रमे प्रथम चार क्रमांक मिळाले. **मेंहदी**-यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट सातारा, डी. वाय. पाटील कॉलेज कोल्हापूर, मुधोजी कॉलेज फलटण यांना अनुक्रमे प्रथम तीन क्रमांक मिळाले. तर आनंदराव नाईक कॉलेज यशवंतनगर, डेक्कन कॉलेज कोल्हापूर यांना उत्तेजनार्थ क्रमांक विभागून देण्यात आला. **वक्तृत्व मराठी**-रत्नाप्पा कुंभार कॉलेज कोल्हापूर, लॉ कॉलेज सातारा, दि न्यू कॉलेज कोल्हापूर यांना अनुक्रमे प्रथम तीन क्रमांक मिळाले. **वक्तृत्व हिंदी**-न्यू कॉलेज कोल्हापूर, डी. पी. भोसले कॉलेज कोरेगाव, आनंदराव नाईक कॉलेज यशवंतनगर यांना अनुक्रमे प्रथम तीन क्रमांक मिळाले. इंग्रजी वक्तृत्व-रत्नाप्पा कुंभार कॉलेज कोल्हापूर, राजाराम बापु इन्स्टिट्यूट साखराळे, इंजिनिअरींग कॉलेज कराड यांना अनुक्रमे प्रथम तीन क्रमांक मिळाले.

वैयक्तिक चॅम्पियन स्पर्धा

शास्त्रीयनृत्य - विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, श्रीमती मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय सांगली, सर्व अधिविभाग शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांना अनुक्रमे प्रथम तीन क्रमांक मिळाले.

नकला - यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट सातारा, राजाराम कॉलेज कोल्हापूर, रत्नाप्पा कॉलेज कोल्हापूर, मुधोजी कॉलेज फलटण यांना अनुक्रमे प्रथम चार क्रमांक मिळाले. **एकपात्री अभिनय** - रत्नाप्पा कुंभार कॉलेज कोल्हापूर, राजाराम कॉलेज कोल्हापूर यांना अनुक्रमे प्रथम दोन क्रमांक मिळाले. तर वेणुताई चव्हाण कॉलेज कराड, विलिंग्डन कॉलेज सांगली यांना तृतीय क्रमांक विभागून देण्यात आले. **सुगम गायन** - विवेकानंद कॉलेज कोल्हापूर यांना प्रथम, सर्व अधिविभाग शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, राजाराम बापू इन्स्टिट्यूट साखराळे यांना द्वितीय क्रमांक विभागून, विलिंग्डन कॉलेज सांगली, आर्टस, सायन्स कॉलेज पलुस यांना तृतीय क्रमांक विभागून तर इंजिनिअरींग कॉलेज कराड यांना उत्तेजनार्थ क्रमांक मिळाला. **शास्त्रीय गायन**-विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज उरण इस्लामपूर, दि न्यू कॉलेज कोल्हापूर, विलिंग्डन कॉलेज सांगली यांना अनुक्रमे प्रथम चार क्रमांक मिळाले. **पाश्चिमात्य एकल गायन**-यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट सातारा, कन्या महाविद्यालय इस्लामपूर यांना अनुक्रमे प्रथम दोन क्रमांक, मुधोजी कॉलेज फलटण, विवेकानंद कॉलेज फलटण यांना तृतीय क्रमांक विभागून मिळाला. **शास्त्रीय सुरवाद्य**-मुधोजी कॉलेज फलटण, रत्नाप्पा कुंभार कॉलेज कोल्हापूर यांना अनुक्रमे प्रथम दोन क्रमांक तर दि न्यू कॉलेज कोल्हापूर, विवेकानंद कॉलेज कोल्हापूर यांना तृतीय क्रमांक विभागून देण्यात आला. **शास्त्रिय ताल वाद्य**-शिक्षण महर्षी बापुजी साळुंखे कॉलेज मिरज, अनंतराव नाईक कॉलेज यशवंतनगर, विवेकानंद कॉलेज कोल्हापूर यांना अनुक्रमे प्रथम तीन क्रमांक मिळाले. **पाश्चिमात्य एकल वादन**-विवेकानंद कॉलेज कोल्हापूर यांना प्रथम तर विलिंग्डन कॉलेज सांगली, यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट सातारा यांना द्वितीय क्रमांक विभागून तर शिवराज कॉलेज गडहिंग्लज, दि न्यू कॉलेज कोल्हापूर यांना तृतीय क्रमांक विभागून देण्यात आले.

भारतीय समूहगीत - रत्नाप्पा कुंभार कॉमर्स कॉलेज कोल्हापूर, विवेकानंद कॉलेज कोल्हापूर यांनी अनुक्रमे प्रथम दोन क्रमांक पटकावले. सद्गुरु गाडगे महाराज कॉलेज कराड व दि न्यू कॉलेज कोल्हापूर यांना तृतीय क्रमांक विभागून देण्यात आला. यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स कॉलेज सातारा यांना उत्तेजनार्थ क्रमांक मिळाला.

पाश्चिमात्य समूहगीत - विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, मुधोजी कॉलेज फलटण, रत्नाप्पा कुंभार कॉलेज कोल्हापूर, यशवंतराव चव्हाण कॉलेज सातारा यांना अनुक्रमे प्रथम चार क्रमांक मिळाले. **लोकवाद्य वृंद**-मुधोजी कॉलेज फलटण, विवेकानंद कॉलेज कोल्हापूर यांना अनुक्रमे प्रथम दोन क्रमांक देण्यात आले. तर बळवंत कॉलेज विटा, यशवंतराव चव्हाण कॉलेज उरण इस्लामपूर यांना तृतीय क्रमांक विभागून देण्यात आले. रत्नाप्पा कुंभार कॉलेज कोल्हापूर यांना उत्तेजनार्थ क्रमांक मिळाला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

31 DEC 2021 पुढारी

विवेकानंद कॉलेजला सर्वसाधारण विजेतेपद

शिवाजी विद्यापीठ युवा महोत्सव : लोककलेत एस.जी.एम., तर लोकनृत्यात पतंगराव कदम कॉलेज प्रथम

महागाव : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठ व येथील संत गजानन महाराज अभियांत्रिकी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ४१ व्या मध्यवर्ती युवा महोत्सवात कोल्हापूरच्या विवेकानंद कॉलेजने सर्वसाधारण विजेतेपद पटकावले, तर सरदार बाबासाहेब माने लोककला फिरता चषक - सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज (कराड), सरदार बाबासाहेब माने लोकनृत्य फिरता चषक - पतंगराव कदम कॉलेज (सांगली), विलिंग्डन महाविद्यालय शताब्दी महोत्सवानिमित्त फिरता गौरव चषक - नृत्य विभाग - विवेकानंद कॉलेज (कोल्हापूर), नाट्य विभाग - दत्ताजीराव कदम कला, विज्ञान व वाणिज्य कॉलेज (इचलकरंजी), संगीत विभाग - विवेकानंद कॉलेज (कोल्हापूर) यांनी पटकाला.

कला विभाग : दत्ताजीराव कदम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय (इचलकरंजी) **वाङ्मय विभाग :** डी. पी. भोसले कॉलेज (कोरेगाव) प्रथम, कुलगुरू स्व. डॉ. आप्पासाहेब पवार वैयक्तिक स्पर्धा जनरल चॅम्पियनशिप फिरता चषक - विवेकानंद कॉलेजने (कोल्हापूर), अभिजितदादा कदम सांघिक स्पर्धा जनरल चम्पियनशीप फिरता चषक - विवेकानंद कॉलेजने (कोल्हापूर) पटकावला.

युवा महोत्सवात कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यांतील १४६ महाविद्यालयांतील १२५० कलाकार सहभागी झाले होते.

सांघिक कलाप्रकार व विजेते अनुक्रमे असे - लोकनृत्य -डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय (सांगली), विवेकानंद कॉलेज (कोल्हापूर), आजरा महाविद्यालय (आजरा), यशवंतराव चव्हाण कॉलेज (उरुण-इस्लामपूर), छत्रपती शिवाजी कॉलेज (सातारा), धनंजयराव गाडगीळ कॉलेज (सातारा). **लोककला** - सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज (कराड), दि न्यू कॉलेज (कोल्हापूर), दहीवडी कॉलेज (दहीवडी), श्रीमती आक्काताई रामगोंडा पाटील कन्या महाविद्यालय महाविद्यालय (वाई), कला-वाणिज्य विज्ञान महाविद्यालय (कोवाड).

एकांकिका : छत्रपती शिवाजी कॉलेज (सातारा) - सर्वोत्कृष्ट स्त्री अभिनय एकांकिका - म्हातारा पाऊस (पात्र म्हातारी), दत्ताजीराव कदम कॉलेज (इचलकरंजी) - एकांकिका १२ किलोमीटर (पात्र-कदुआ), छत्रपती शिवाजी कॉलेज (सातारा) - सर्वोत्कृष्ट स्त्री अभिनय एकांकिका - म्हातारा पाऊस (पात्र म्हातारी), दत्ताजीराव कदम कॉलेज (इचलकरंजी) - लघुनाटिका - श्री शिवशाहू महाविद्यालय (सरुड), शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे कॉलेज (मिरज), यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स (सातारा), विवेकानंद कॉलेज (कोल्हापूर).

पथनाट्य : दि न्यू कॉलेज (कोल्हापूर), विवेकानंद कॉलेज (कोल्हापूर), छत्रपती शिवाजी कॉलेज (सातारा), दत्ताजीराव कदम कॉलेज (इचलकरंजी), यशवंतराव चव्हाण कॉलेज (उरुण-इस्लामपूर). **भारतीय समूहगीत** - देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज (कोल्हापूर), विवेकानंद कॉलेज (कोल्हापूर), गाडगे महाराज कॉलेज (कराड), दि न्यू कॉलेज (कोल्हापूर), यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट (सातारा). **पाश्चिमात्य समूहगीत** - विवेकानंद कॉलेज (कोल्हापूर), मुधोजी कॉलेज (फलटण), देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज (कोल्हापूर), यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट सायन्स (सातारा). **लोकवाद्यवृंद** - मुधोजी कॉलेज (फलटण), विवेकानंद कॉलेज (कोल्हापूर), बळवंत कॉलेज (विटा), यशवंतराव चव्हाण कॉलेज (उरुण-इस्लामपूर), देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज (कोल्हापूर).

महागाव : शिवाजी विद्यापीठ व संत गजानन महाराज अभियांत्रिकी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मध्यवर्ती युवा महोत्सवात पारितोषिकप्राप्त संघाला गौरविताना अभिनेता राहुल मगदूम व इतर.

मेहंदी : यशवंतराव चव्हाण (सातारा), डी. वाय. पाटील कॉलेज (कसबा बावडा), मुधोजी कॉलेज (फलटण), डेक्कन कॉलेज ऑफ इंटिरिअर डिझाईन (कोल्हापूर), आनंदराव बळवंतराव नाईक कॉलेज यशवंतनगर (चिखली). **वक्तृत्व : (मराठी)** - देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज, (कोल्हापूर), इस्माईलसाहेब मुल्ला कॉलेज, (सातारा), दि न्यू कॉलेज (कोल्हापूर). **वक्तृत्व - (हिंदी) :** न्यू कॉलेज (कोल्हापूर), डी. पी. भोसले कॉलेज, (कोरेगाव), आनंदराव नाईक कॉलेज (चिखली). **वक्तृत्व : (इंग्रजी)** - देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज (कोल्हापूर) राजारामबापू टेक्नॉलॉजी (साखराळे), कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (कराड).

पाश्चिमात्य एकल वादन : विवेकानंद कॉलेज (कोल्हापूर), विलिंग्डन महाविद्यालय (सातारा), यशवंतराव चव्हाण कॉलेज (सातारा), शिवराज महाविद्यालय (गडहिंग्लज), दि न्यू कॉलेज (कोल्हापूर).

स्थळचित्र : शिवराज महाविद्यालय (गडहिंग्लज), दत्ताजीराव कदम कॉलेज (इचलकरंजी), राजा शिवछत्रपती कॉलेज (महागाव), कॉलेज ऑफ आर्किटेक्चर (कोल्हापूर). **व्यंगचित्र :** विवेकानंद कॉलेज (कोल्हापूर), शिवशाहू महाविद्यालय (सरुड), मुधोजी कॉलेज (फलटण), कॉलेज ऑफ आर्किटेक्चर (कोल्हापूर), देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज (कोल्हापूर).

भित्तीचित्र कला : प्रबोधिनी इन्स्टिट्यूट ऑफ डिझाईन भालजी पेंढारकर सांस्कृतिक केंद्र (कोल्हापूर), कला महाविद्यालय (गडहिंग्लज), मुधोजी कॉलेज (फलटण), शिवशाहू महाविद्यालय (सरुड), बाबा नाईक महाविद्यालय (कोकरूड).

सुगम गायन : विवेकानंद कॉलेज (कोल्हापूर), सर्व अधिविभाग शिवाजी विद्यापीठ (कोल्हापूर), राजारामबापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (साखराळे), विलिंग्डन महाविद्यालय सांगली), कला महाविद्यालय, (पलूस), इंजिनिअरिंग कॉलेज (कराड).

कातरकाम : देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज (कोल्हापूर), शिवशाहू महाविद्यालय (सरुड), विवेकानंद कॉलेज (कोल्हापूर), दत्ताजीराव कदम कॉलेज (इचलकरंजी).

स्थळ छायाचित्र - कला महाविद्यालय (गडहिंग्लज), यशवंतराव चव्हाण कॉलेज (उरुण-इस्लामपूर), विवेकानंद कॉलेज (कोल्हापूर), शिवशाहू महाविद्यालय (सरुड).

मातीकाम : दत्ताजीराव कदम कॉलेज (इचलकरंजी), वेणुताई कॉलेज (कराड), मुधोजी कॉलेज (फलटण), कला महाविद्यालय (गडहिंग्लज), रत्नाप्पा कुंभार कॉलेज (कोल्हापूर).

रांगोळी - दत्ताजीराव कदम कॉलेज (इचलकरंजी), शिवराज महाविद्यालय (गडहिंग्लज), डॉ. पतंगराव कदम कॉलेज (सांगली), इस्माईलसाहेब मुल्ला कॉलेज (सातारा), कुसुमताई महाविद्यालय (इस्लामपूर).

शास्त्रीय गायन : विवेकानंद कॉलेज (कोल्हापूर), कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय (उरुण-इस्लामपूर), न्यू कॉलेज (कोल्हापूर), विलिंग्डन महाविद्यालय (सांगली).

पाश्चिमात्य एकल गायन : यशवंतराव चव्हाण कॉलेज (सातारा), कुसुमताई कन्या महाविद्यालय (इस्लामपूर), मुधोजी कॉलेज (फलटण), विवेकानंद कॉलेज (कोल्हापूर).

शास्त्रीय सूरवाद्य : मुधोजी कॉलेज (फलटण), देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज (कोल्हापूर), न्यू कॉलेज (कोल्हापूर), विवेकानंद कॉलेज (कोल्हापूर).

शास्त्रीय तालवाद्य : शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे कॉलेज (मिरज), देशभक्त आनंदराव बळवंतराव नाईक कॉलेज, विवेकानंद कॉलेज (कोल्हापूर).

वैयक्तिक कला प्रकार : अनुक्रमे निकाल - **शास्त्रीय नृत्य** - विवेकानंद कॉलेज (कोल्हापूर), नथुबाई गरवारे महाविद्यालय (सांगली), अधिविभाग शिवाजी विद्यापीठ (कोल्हापूर).

नकला : यशवंतराव चव्हाण कॉलेज (सातारा), राजाराम कॉलेज (कोल्हापूर), देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज (कोल्हापूर), मुधोजी कॉलेज, (फलटण).

एकपात्री अभिनय : देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज (कोल्हापूर), राजाराम कॉलेज (कोल्हापूर), वेणुताई कॉलेज (कराड), विलिंग्डन महाविद्यालय (सांगली).

यावेळी यशस्वितांना कुलगुरू डॉ. डी. टी शिर्के, संस्थाध्यक्ष ॲड. अण्णासाहेब चव्हाण, अभिनेता राहुल मगदूम यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.

अध्यक्षस्थानावरून बोलताना संत गजानन महाराज शिक्षण समूहाचे संस्थापक अध्यक्ष ॲड. अण्णासाहेब चव्हाण म्हणाले, यशवंतराव चव्हाण यांच्यामुळे कोल्हापुरात बहुजनांचे विद्यापीठ उभे राहिले. रयतेची लेकरे शिकली, त्यांच्यातील कला, संशोधन आणि नवनिर्मिती जगासमोर आली याचा मनस्वी आनंद आहे. युवा महोत्सव हा माझ्या आयुष्यातील अविस्मरणीय दिवस आहे.

प्राचार्य डॉ. एस. एच. सावंत यांनी स्वागत केले. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, पी.एस. पाटील, अभिनेता राहुल मगदूम, संघप्रमुख आर. डी. कांबळे, विद्यार्थी प्रतिनिधी हेमा राजवर्धन यांनी मनोगत व्यक्त केले.

यावेळी डॉ. यशवंत चव्हाण, संस्था सचिव ॲड. बाळासाहेब चव्हाण, डॉ. आर. जी. कोरबू, डॉ. बी. व्ही. ताम्हणकर, व्ही. एम. पाटील, व्ही. आय. कदम आदी उपस्थित होते. विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांनी प्रास्ताविक केले. एस. बी. पोवार यांनी आभार मानले.

31 DEC 2021

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

कोल्हापूरचे किरण गुरव, 'लोकमत'चे संजय वाघ यांच्यासह प्रणव सखदेव मानकरी

राज्यातील तिघांना साहित्य अकादमी पुरस्कार

लोकमत न्यूज नेटवर्क

नवी दिल्ली : साहित्य अकादमीचे यावर्षीचे पुरस्कार जाहीर झाले असून, मराठी साहित्यासाठीच्या पुरस्कार विजेत्यांमध्ये यंदा लेखक किरण गुरव, कादंबरीकार प्रणव सखदेव, आणि बालसाहित्यिक संजय वाघ यांचा समावेश आहे. वाघ हे 'लोकमत'च्या नाशिक आवृत्तीत उपवृत्तसंपादक असून, त्यांनी लहान मुलांसाठी आतापर्यंत विपुल लिखाण केले आहे.

साहित्य अकादमीने किरण गुरव यांच्या 'बाळूच्या अवस्थांतराची डायरी' लघुकथासंग्रहाला अकादमीचा मुख्य पुरस्कार (१ लाख रूपये) मिळाला आहे. साहित्य युवा अकादमी पुरस्कारासाठी प्रणव सखदेव यांच्या 'काळे करडे स्ट्रोक्स' कादंबरीची निवड करण्यात आली आहे.

संजय वाघ यांना 'जोकर बनला किंगमेकर' या कादंबरीसाठी साहित्य अकादमीचा बालसाहित्य पुरस्कार जाहीर झाला आहे. संजय वाघ यांची आठ पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

खुप आनंद होत आहे. माझ्यासह कथा या साहित्यप्रकाराला बळ देणारा हा पुरस्कार आहे. माझ्यापेक्षा हा कथेचा सन्मान आहे. जयंत पवार या अफाट कथाकाराची आठवण या पुरस्काराच्या क्षणी मनाला कातर करते आहे. मराठी कथेला आणि खेड्यातील अनेक लिहित्या हातांना या पुरस्काराने ऊर्जा मिळावी.

- डॉ. किरण गुरव, साहित्यिक

-वृत्त/३

कोल्हापूर जिल्ह्यातील आतापर्यंतचे साहित्य अकादमी पुरस्कार विजेते

वि. स. खांडेकर-ययाती (१९६०), रणजित देसाई-स्वामी (१९६४), अनंत यादव-झोंबी (१९९०), विश्वास पाटील- झाडाझडती (१९९२), राजन गवस- तणकट (२००१), जयंत नारळीकर-चार नगरातले माझे विश्व (२०१४)

साहित्य अकादमीचा पुरस्कार प्राप्त होणे ही तशी प्रत्येक लेखकासाठी सर्वोच्च आनंदाची आणि अभिमानाची बाब असते. त्या आनंदाचा मी एक भाग झालो याचे अतीव समाधान आहे. आत्मविश्वास हरवलेल्या मुलांना प्रेरणा, उभारी मिळावी या हेतूने लिहिलेल्या 'जोकर बनला किंगमेकर' या किशोर कादंबरीवर पसंतीची मोहोर उमटल्याने माझ्या लेखनाचे चीज झाले असे मला वाटते.

- संजय वाघ, बालसाहित्यिक

मुख्यमंत्र्यांकडून अभिनंदन

मराठीचा प्रवाह विविध साहित्यकृतींद्वारे आणखी समृद्ध करण्याचे काम अनेक लेखक मोठ्या उमेदीने करत असतात. त्यांच्या या लेखन प्रवासाला यामुळे बळ मिळेल, अशा शब्दांत पुरस्कार विजेत्यांचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

ज्येष्ठ लेखक इंद्रजित भालेराव, नागनाथ कोत्तापल्ले आणि भास्कर चंदनशिव या परीक्षकांचा मराठी भाषेतील साहित्यासाठीच्या परीक्षकांमध्ये समावेश होता. साहित्य अकादमीचे अध्यक्ष डॉ. चंद्रशेखर कंबार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यकारी मंडळाच्या बैठकीत देशातील २२ प्रादेशिक भाषांसाठी पुरस्कारांची निवड व घोषणा करण्यात आली. रोख ५० हजार रुपये व ताम्रपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

31 DEC 2021 लोकमत

किरण गुरव यांना साहित्य अकादमीचा पुरस्कार जाहीर

'बाळूच्या अवस्थांतरांची डायरी'ची झाली निवड

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे अधीक्षक आणि साहित्यिक किरण अनंत गुरव यांच्या 'बाळूच्या अवस्थांतरांची डायरी' या कथासंग्रहास साहित्य अकादमीचा पुरस्कार गुरुवारी जाहीर झाला. मानचिन्ह, शाल आणि रोख एक लाख रुपये या पुरस्काराचे स्वरूप आहे. पुरस्कारासाठी निवड झालेल्या कथासंग्रहामध्ये गुरव यांनी शहरात आलेल्या खेडेगावातील मुलांची काय अवस्था होते, याचे चित्रण मांडले आहे.

साहित्यिक गुरव यांचे मूळ गाव राधानगरी आहे. त्यांच्या राखीव सावल्यांचा खेळ, श्रीलिपी, बाळूच्या अवस्थांतरांची डायरी आणि क्षुधाशांती भुवन हे कथासंग्रह आणि जुगाड ही कादंबरी प्रसिद्ध आहे. त्यांच्या साहित्यकृतींना पुरस्कार प्राप्त झाले आहेत. त्यांच्या जुगाड या कादंबरीचा शिवाजी विद्यापीठ, मुंबई विद्यापीठाच्या

अभ्यासक्रमात समावेश झाला आहे. गुरव यांना 'साहित्य निर्मिती प्रक्रियेचा मानसशास्त्रीय अभ्यास' या विषयावर मानव्यविद्या विद्याशाखेतून शिवाजी विद्यापीठाची पीएच.डी. पदवी मिळाली आहे. गुरव यांना जाहीर झालेल्या पुरस्काराच्या वितरणाची तारीख साहित्य अकादमीतर्फे जाहीर केली जाणार आहे. साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळालेले गुरव हे कोल्हापूरचे दुसरे लेखक ठरले आहेत. यापूर्वी लेखिका सोनाली नवांगुळ यांना पुरस्कार मिळाला होता.

खेड्यापाड्यातील मुलांची कथा

खेड्यापाड्यातील नव्यानं लिहितं होणाऱ्या मुलांना कथा हा साहित्यप्रकार त्यातल्या वेल्हाळपणामुळं खूप आपलासा वाटतो. 'बाळूच्या अवस्थांतरांची डायरी'मधील बाळू हा अशा मुलांचा प्रतिनिधी आहे. शिक्षणासाठी शहराकडे होणारे बाळूचे स्थलांतर हळूहळू त्याचे मानसिक अवस्थांतर बनते. बाळूची खेडूत मानसिकता आणि तिला दिसणारे आक्राळ विक्राळ शहर यांच्यातील टकराव हा एक सार्वत्रिक अनुभव आहे. त्यामुळे खेड्यापाड्यातील अनेक मुलांना ही कथा त्यांचीच वाटते, असे गुरव यांनी सांगितले.

पुढारी

डॉ. किरण गुरव यांना साहित्य अकादमी पुरस्कार

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठातील अधीक्षक, मराठी कथालेखक, कादंबरीकार डॉ. किरण गुरव यांच्या 'बाळूच्या अवस्थांतरांची डायरी' या कथासंग्रहास प्रतिष्ठेचा साहित्य अकादमीचा पुरस्कार जाहीर झाला. यामुळे शिवाजी विद्यापीठासह कोल्हापूरच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे.

गुरव हे मूळचे राधानगरी येथील आहेत. त्यांनी 'साहित्य निर्मिती प्रक्रियेचा मानसशास्त्रीय अभ्यास' या विषयातून पीएचडी मिळविली. विद्यापीठात कनिष्ठ लिपिक म्हणून रुजू झालेले गुरव आता अधीक्षक आहेत.

डॉ. गुरव यांचे श्रीलिपी, क्षुधाशांती भुवन हे कथासंग्रह प्रकाशित आहेत. 'राखीव सावल्यांचा खेळ' या पहिल्याच कथासंग्रहाला महाराष्ट्र फाऊंडेशनचा (अमेरिका) पुरस्कार मिळाला. 'जुगाड' या पहिल्याच कादंबरीस महाराष्ट्र शासनाचा ह. ना. आपटे पुरस्कार मिळाला आहे. त्यांच्या कथांचा विविध विद्यापीठांच्या अभ्यासक्रमात समावेश आहे.

पुढारी

ऑनलाईन परीक्षेची युद्धपातळीवर तयारी

लवकरच वेळापत्रक जाहीर; ६६४ अभ्यासक्रम

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

विद्यापीठ, महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांच्या संप स्थगितीनंतर शिवाजी विद्यापीठ परीक्षा विभागाने हिवाळी सत्रातील परीक्षा ऑनलाईन पद्धतीने घेण्याचे नियोजन युद्धपातळीवर सुरू केले आहे.

विद्यापीठ कार्यक्षेत्रातील सांगली, सातारा व कोल्हापूर जिल्ह्यातील सुमारे २ लाख २० हजार विद्यार्थी ६६४ अभ्यासक्रमांच्या परीक्षांना बसणार आहेत. सध्या दूरशिक्षण विभागाच्या प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसह इतर अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू आहे. प्रथम वर्षाच्या परीक्षा महाविद्यालय स्तरावर ऑनलाईन पद्धतीने होणार आहेत.

द्वितीय व तृतीय वर्षाच्या परीक्षा विद्यापीठाकडून ऑनलाईन पद्धतीने घेतल्या जातील. अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, आर्किटेक्चर, एमबीए, लॉ, एज्युकेशन अभ्यासक्रमाच्या परीक्षा क्लस्टर पद्धतीने होतील, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे यांनी दिली.

31 DEC 2021

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

कोल्हापूरचे किरण गुरव साहित्य अकादमीचे मानकरी

वेरेकर यांनाही पुरस्कार; बालसाहित्यासाठी संजय वाघ, तर सखदेव यांचा समावेश

सकाळ न्यूज नेटवर्क

नवी दिल्ली, ता. ३० : साहित्य क्षेत्रातील प्रतिष्ठेच्या समजल्या जाणाऱ्या २०२१ च्या साहित्य अकादमी सन्मानांची आज दिल्लीत घोषणा करण्यात आली. 'मराठी'साठी कोल्हापूर शिवाजी विद्यापीठाचे अधीक्षक, मराठी कथा व कादंबरीकार डॉ. किरण गुरव यांच्या 'बाळूच्या अवस्थांतराची डायरी' या कथासंग्रहाला, तर 'कोकणी'मध्ये संजय वेरेकर यांच्या 'रक्तचंदन' या काव्यसंग्रहाला साहित्य अकादमी सन्मान जाहीर झाला आहे. एक लाख रुपये रोख शाल आणि ताम्रपट असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

किरण गुरव

प्रणव सखदेव

कोल्हापूर येथील लेखिका सोनाली नवांगुळ यांना यापूर्वीचा साहित्य अकादमीचा पुरस्कार जाहीर झाला होता. त्याचे वितरण आज दिल्लीत सुरू असताना साहित्य अकादमीचे पुरस्कार जाहीर झाले. सर्वसाधारणपणे फेब्रुवारीत साहित्य अकादमी पुरस्कारांचे वितरण करण्यात येते. मात्र यंदा कोरोना महामारीचा पुन्हा उद्रेक झाल्याने पुरस्कार वितरणाची तारीख नंतर कळविण्यात येईल असे अकादमीचे सचिव के. श्रीनिवास राव यांनी 'सकाळ'ला सांगितले.

साहित्य अकादमीचे अध्यक्ष चंद्रशेखर कंबार यांच्या अध्यक्षतेखाली कार्यकारी मंडळाच्या बैठकीनंतर साहित्य अकादमी सन्मान तसेच युवा आणि बालसाहित्य पुरस्कारांची घोषणा करण्यात आली. संजय वाघ यांच्या 'जोकर बनला किंगमेकर' या कादंबरीला बालसाहित्याचा तसेच प्रणव सखदेव यांच्या 'काळेकरडे स्ट्रोक्स' या कादंबरीला युवा साहित्याचा पुरस्कार जाहीर झाला आहे.

पान ९ वर »

नवी दिल्ली : लेखिका सोनाली नवांगुळ, मंजूषा कुलकर्णी यांना गुरुवारी साहित्य अकादमीचे अध्यक्ष चंद्रशेखर कंबार यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले.

कथांचा विविध विद्यापीठांच्या अभ्यासक्रमात समावेश

डॉ. गुरव मूळचे राधानगरीचे असून त्यांचे आजवर चार कथासंग्रह आणि एक कादंबरी प्रसिद्ध झाली आहे. त्यांच्या 'राखीव सावल्यांचा खेळ' या पहिल्याच कथासंग्रहाला अमेरिकेतील महाराष्ट्र फाउंडेशनचा पुरस्कार मिळाला. त्याचबरोबर शासनाला ग. ल. ठोकळ, मुंबई साहित्य संघाचा कथाकार शांताराम आदी पुरस्काराने या कथासंग्रहाला गौरवण्यात आले. त्यांच्या 'जुगाड' या पहिल्याच कादंबरीला शासनाच्या ह. ना. आपटे पुरस्काराने गौरवण्यात आले. या कादंबरीलाही अनेक पुरस्कारांनी गौरवण्यात आले. त्यांच्या एकूणच साहित्यलेखनासाठीही विविध पुरस्कार मिळाले आहेत. त्यांच्या कथासंग्रहातील अनेक कथा राज्यातील विविध विद्यापीठांच्या अभ्यासक्रमात समाविष्ट असून साहित्य अकादमीसह विविध ठिकाणी त्यांना कथा, निबंध वाचनासाठी आमंत्रित केले जाते.

गावगाड्यातील लेखकांचा सन्मान
टुडे पान १ वर »

सकाळ

कोल्हापूरचे किरण गुरव साहित्य अकादमीचे मानकरी

» पान १ वरून

कोकणीचा गौरव

'कोकणी'साठी अनुक्रमे सुमेधा कामत देसाय (लघुकादंबरी- सुमीचे कॉटन्‌स्री) आणि श्रद्धा गरड (कविता संग्रह- काव्य करमाळ) यांना अकादमी पुरस्कार जाहीर झाले. हे दोन्ही पुरस्कार प्रत्येकी ५० हजार रुपये रोख शाल आणि ताम्रपत्र या स्वरूपाचे आहेत.यंदाच्या साहित्य अकादमी सन्मानामध्ये सात काव्यसंग्रह पाच कथासंग्रह, दोन कादंबऱ्या, दोन नाटके, एक चरित्र, एक आत्मकथन, एक महाकाव्य आणि एक टीका अशा गटातील पुस्तकांचा समावेश आहे. इंग्रजीसाठी नमिता गोखले यांच्या 'थिंग्स टू लिव्ह बिहाइंड' या कादंबरीची निवड झाली आहे. हिंदीसाठी दयाप्रकाश सिन्हा तर संस्कृतसाठी विघ्नेवरीप्रसाद मिश्र यांना पुरस्कार जाहीर झाले आहेत.

परीक्षण मंडळ

सतीश आळेकर, वसंत पाटणकर आणि रवींद्र शोभणे यांच्या परीक्षण मंडळाने मराठीसाठी अकादमी पुरस्कार विजेत्यांची निवड केली. कोकणीसाठी ज्येष्ठ साहित्यिक दामोदर मावजो, आर. एस. भास्कर आणि तुकाराम रामा शेठ यांच्या परीक्षक मंडळाने निवड केली. मराठी बालसाहित्य परिक्षक मंडळात माधुरी पुरंदरे, श्रीकांत देशमुख आणि विश्वास पाटील- धुले यांचा तर युवा साहित्य निवड समितीत भास्कर चंदनशिव, इंद्रजित भालेराव आणि नागनाथ कोत्तापल्ले यांचा समावेश होता.

गुजराती विजेत्यांची घोषणा नाही

साहित्य अकादमी पुरस्कार २० भाषांमधील साहित्यकृतींना देण्यात येतात. यावर्षी प्रत्येक गटात किमान दोन भाषांचे पुरस्कार जाहीर करण्यात आले नाहीत. गुजराती, उर्दू, मैथिली आणि मणिपुरी या भाषांचे पुरस्कार विजेत्यांची नावे नंतर जाहीर करण्यात येतील असे सांगण्यात आले. गुजरातीसाठी तर यंदा मुख्य सन्मानासह बाल आणि युवा साहित्य पुरस्कार गटातही विजेत्यांची नावे जाहीर न झाल्याने तो चर्चेचा विषय ठरला आहे.

अनुवाद पुरस्कारांचे वितरण

साहित्य अकादमीच्या अनुवाद पुरस्कारांचे आज सायंकाळी एका छोटेखानी समारंभात वितरण झाले. 'मराठी'साठी सोनाली नवांगुळ, 'कोकणी'साठी जयश्री शानभाग यांना तर 'संस्कृत'साठी मंजूषा कुलकर्णी यांना साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार प्रदान करण्यात आले. नेहमीच्या प्रथेप्रमाणे कमानी सभागृहात हा कार्यक्रम होणार होता. मात्र दिल्लीत कोरोनाचे आरोग्यविषय नियम लागू असल्याने तो रद्द करण्यात आला. अकादमीच्या सभागृहातच हे पुरस्कार वितरण करण्यात आले. कंबार यांच्या हस्तेच हे पुरस्कार देण्यात आले. अकादमीचे सचिव के. श्रीनिवास राव हेही यावेळी उपस्थित होते. विजेत्यांवर साहित्य आणि संस्कृती वर्तुळातून शुभेच्छांचा वर्षाव होऊ लागला आहे.

31 DEC 2021

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

गावगाड्यातल्या लेखकांचा सन्मान : डॉ. गुरव

सकाळ वृत्तसेवा

किरण गुरव

कोल्हापूर, ता. ३० : 'गावगाड्यातल्या नव्यानं लिहितं होणाऱ्या पोरांना कथा हा साहित्यप्रकार खूप आपलासा वाटतो. 'बाळूच्या अवस्थांतराची डायरी' या कथासंग्रहाला साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाल्याने माझ्याबरोबरच कथा या साहित्यप्रकाराला बळ मिळाले,' अशा भावना आज शिवाजी विद्यापीठाचे अधीक्षक डॉ. किरण गुरव यांनी व्यक्त केल्या. पुरस्कार मिळाल्याचा आनंदच असल्याचे सांगून डॉ. गुरव यांनी या कथासंग्रहाबाबतही माहिती दिली.

डॉ. गुरव म्हणाले, ''तीन दीर्घकथांचा हा संग्रह आहे. त्यातील बाळू हा खेड्यापाड्यातील मुलांचा प्रतिनिधी आहे.

शिक्षणासाठी शहराकडे होणारे त्याचे स्थलांतर हळूहळू त्याचे मानसिक अवस्थांतर बनते. बाळूची खेडूत मानसिकता आणि तिला दिसणारे आक्राळ विक्राळ शहर यांच्यातील टकराव हा एक सार्वत्रिक अनुभव आहे. त्यामुळे

अशा सर्व मुलांना ही आपलीच कथा वाटते.

संग्रहातील 'इंदूलकरांची कथा' हीदेखील कथानिर्मिती, लेखकाचे चरित्र आणि त्याचा काळ यांची परस्पर गुंफण तपासते. या इंदूलकरांना कधीकधी त्राग्यानं जीवसृष्टीत जन्माला आल्याबद्दल वाईटही वाटते.

पण, कथेच्या सरतेशेवटी ते आपल्या जन्मास कारण ठरलेल्या भैरीस्वरूप निसर्गाचे, आई-वडिलांचे शुक्रगुजार होतात. आपला जन्म म्हणजे या सर्वांनी मिळून सृष्टीत घडवून आणलेला एक छोटासा जैविक महास्फोट आहे, या निष्कर्षाला ते अखेरीस येतात.''

जयंत पवार या कथाकाराची आठवण पुरस्काराच्या क्षणी मनाला कातर करते आहे. मराठी कथेला आणि गावगाड्यातील अनेक लिहित्या हातांना या पुरस्काराने ऊर्जा मिळावी, हीच अपेक्षा असल्याचेही ते म्हणाले. दरम्यान, ते मूळचे राधानगरीचे असून 'राखीव सावल्यांचा खेळ', 'श्रीलिपी', 'क्षुधाशांती भुवन' या कथासंग्रहासह 'जुगाड' ही त्यांची कादंबरी प्रसिद्ध झाली आहे. 'साहित्यनिर्मिती प्रक्रियेचा मानसशास्त्रीय अभ्यास'' या विषयावर संशोधन करून त्यांनी 'पीएच.डी.' मिळवली आहे.

तरुण भारत

किरण गुरव यांना 'साहित्य अकादमी'

वृत्तसंस्था
नवी दिल्ली

साहित्य अकादमीने यंदाचे प्रतिष्ठेचे 'साहित्य अकादमी पुरस्कार" जाहीर केले आहेत. साहित्य अकादमीने गुरुवारी २० भाषांमधील वार्षिक साहित्य अकादमी पुरस्कार–२०२१ जाहीर केले. यंदाच्या साहित्य अकादमी पुरस्कारासाठी हिंदी साहित्यासाठी ज्येष्ठ साहित्यिक दया प्रकाश सिन्हा आणि इंग्रजीसाठी नमिता गोखले यांची निवड करण्यात आली आहे. तसेच मराठीत मुख्य पुरस्कार किरण गुरव यांचा कथासंग्रह 'बाळूच्या अवस्थांतराची डायरी" यांना जाहीर झाला आहे. तसेच कन्नड साहित्यासाठी डी. एस. नागभूषण यांच्या 'गांधी कथा" या चरित्राला आणि कोकणी साहित्यासाठी संजीव वेरेकर यांच्या 'रक्तचंदन" काव्यसंग्रहाला घोषित करण्यात आला.

२० भारतीय भाषांमधील ज्युरी समित्यांनी पुरस्कारांची शिफारस केली होती. साहित्य अकादमीचे अध्यक्ष डॉ. चंद्रशेखर कंबार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या अकादमीच्या कार्यकारी मंडळाच्या बैठकीत गुरुवारी पुरस्कार विजेत्यांच्या यादीला मान्यता देण्यात आली. मराठीतील युवा लेखक प्रणव सखदेव यांच्या 'काळेकरडे स्ट्रोक्स" या कादंबरीला युवा साहित्य पुरस्कार मिळाला असून 'जोकर बनला किंगमेकर" या पुस्तकासाठी संजय वाघ यांना बालसाहित्य पुरस्कार मिळाला आहे. मुख्य पुरस्कारांबरोबरच एकूण २२ प्रादेशिक भाषांसाठी युवा पुरस्कार घोषित करण्यात आला आहे. ५०,००० रुपये आणि ताम्रपत्र असे पुरस्काराचे स्वरुप आहे.